# 'मराठी विज्ञान साहित्य'

**प्रा.डी.जे.दमामे.**
सहा.प्राध्यापक,मराठी विभाग आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज आष्टा. ता.वाळवा,जि.सांगली.४१६३०३

प्रस्तावना : विज्ञानसाहित्य केवळ विज्ञानाचा विषय नसून साहित्याचा भाग आहे. मराठी मध्ये 'विज्ञान साहित्य'ही संज्ञा 'Science Fiction'या संज्ञेचा पर्याय आहे.या संज्ञेमध्ये विज्ञानकथा,विज्ञान कादंब—या आणि थोडया प्रमाणात विज्ञान कविता, विज्ञान नाटकाचा समावेश होतो.विज्ञान साहित्यात विज्ञान हा शब्द येत असला तरी ''विज्ञान साहित्य ही कल्पनेच्या स्तरावरील नवनिर्मिती असते. संभवनीयता आणि शक्यता यांच्या मर्यादेत येथे कल्पित वावरत असते. सौंदर्यानंद देणे हेच विज्ञान साहित्याचे अंतिम प्रयोजन ठरते. कुठल्याही साहित्यकृतीचे हेच प्रयोजन असते. विज्ञान शिक्षण देणारे किंवा सुबोध सोपे केलेले मनोरंजन करून सांगितलेले विज्ञान म्हणजे विज्ञानसाहित्य नव्हे, तर विज्ञान साहित्य ही साहित्याची एक शाखा आहे''

विज्ञान साहित्य म्हणजे विज्ञान विषयक लेखन नव्हे. विज्ञान साहित्यांच्या केंद्रस्थानी माणूस असतो. विज्ञानसाहित्य विश्वामध्ये माणसाचे काय स्थान आहे? याचा शोध घेते. विज्ञान साहित्यात केवळ शोधाचे चित्रण अपेक्षित नसून वैज्ञानिक प्रगतीचा माणसावर व या शोधामुळे समाजजीवनावर काय परिणाम होतो याचे चित्रण अपेक्षित असते म्हणजे विज्ञान साहित्यात शोधाला महत्व नसून त्यामुळे होणा—या बदलाला महत्व आहे.यंत्र,यंत्रमानव,पर्यावरण,पृथ्वी,अवकाश अशा विविध विषयाच्या अंगाने विज्ञान साहित्य लिहिले. विज्ञान साहित्याचा अनेक विचारवंतांनी विविध अंगांनी विचार केला आहे.त्यात विज्ञान साहित्याचे स्वरूप वरील विंवचनेतून स्पष्ट होते.मात्र जयंत नारळीकरांसारख्या शास्त्रज्ञ असलेल्या विज्ञान लेखकाच्या विज्ञानकथा लेखनामागचा उद्देश मनोरंजन नाही. विज्ञानाची माहिती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा प्रचार करण्यासाठी विज्ञान व कथा लिहिल्या जाव्यात असे त्यांना वाटते ते म्हणतात''विज्ञानाची गोळी जर कडू लागत असेल तर त्याला साखरेचे कोटींग म्हणजे कथेचे रूप देणे योग्य ठरेल.विज्ञानकथा अशा उद्देशाने लिहील्या जाव्यात.असे मला वाटते निदान मी लिहितो त्या कथा हयाच उद्देशाने लिहिलेल्या आहेत.''

विज्ञान साहित्याचा विचार करताना अनेक लेखकांनी व्याख्येत आपली वेगवेगळी मते मांडली आहेत.विज्ञान कथेविषयीची व्याख्या ही विज्ञान साहित्याची व्याख्या ठरते ती विज्ञान कांदबरीसाठी विचारात घेता येईल.आ.ना.पेडणेकर म्हणतात,''भक्कम शास्त्रीय पुरावा आणि बुध्दिनिष्ठ अंदाज हयावर विज्ञान कथा आधारीत असते विज्ञान कथालेखकाची कल्पनाशक्ती, अस्तित्वात नसलेल्या शक्यतेच्या प्रांतात शिरते.पण हा प्रदेश अशक्यतेचा नसतो.'' म्हणजे लेखक कल्पनेत,अस्तित्वात नसलेल्या शक्यतेच्या प्रांतात शिरून वेगळा अनुभव देण्याचा प्रयत्न करतो.डॉ.व.दि. कुलकर्णी म्हणतात''विज्ञान साहित्य म्हणजे उदयाच्या विज्ञानाचे विज्ञानकल्पित जीवन चरित्र असे मानून चालणे चुकीचे आहे.पृथ्वीवरचे आणि आजचे म्हणजे 'हिअर ॲन्ड नाऊ' चे विज्ञाननिष्ठ कल्पना चित्र काढणे याचा अंतर्भाव विज्ञान साहित्यात करायला हवा.'' या शिवाय विज्ञान साहित्यात भविष्यकाळात डोकावणे म्हणजे सध्या जे विज्ञानाने मान्य केले त्याच्या एक पाऊल पुढे जाऊन त्यावर आधारित कथा कांदबरी लिहिणे हाही एक भाग आहे.

विज्ञान कथा हा प्रकार उदयास आल्यानंतर त्याचे साहित्यातील स्थान नक्की करण्यासाठी तिची व्याख्या करण्याची गरज भासू लागली.मराठी विज्ञान साहित्यावर चर्चा करण्यासाठी १९८३ मध्ये मुंबईत,१९८५ मध्ये नागपुर व १९८६ मध्ये पुणे येथे विज्ञान परिषदा घेतल्या गेल्या होत्या.१९८३ च्या मुंबई विज्ञान परिषदेत निरंजन घाटेनी मराठी विज्ञान साहित्यावर निबंध वाचला होता.त्यात त्यांनी 'सायन्स फिक्शन'च्या काही जाणकारांच्या व्याख्या दिल्या आहेत.रॉबर्ट हेनलिनच्या मते,'' विज्ञान कथेमध्ये अज्ञानाच्या प्रदेशात पाऊल टाकायचे असले तरी ते ज्ञान विज्ञानाशी फटकून असता कामा नये.त्यासाठी सध्याच्या वैज्ञानिक जगाचे पुरेसे खोल ज्ञान असणे जरूरीचे आहे.''

अशा अनेक विचारवंतानी विज्ञान साहित्याची ढोबळ मनाने व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र अचूक आणि समावेशक व्याख्या अजुनही करता आलेली नाही.तरी या व्यांख्यांच्या आधारे त्याची निश्चित काही **बलस्थाने व वैशिष्टये** सांगता येतील.

१विज्ञान साहित्याचे सर्वात महत्वाचे वैशिष्टय म्हणजे अनुभवाचे वेगळेपण होय.कधी कधी तो अनुभव काल्पनिक असला तरी अवास्तव नसतो.शक्यतेच्या पातळीवर तो मनाला भिडणारा असतो.

२ विज्ञान साहित्यात शोधापेक्षा शोधांमध्ये होणा—या बदलाला महत्व असते.

३ विज्ञान साहित्याचा पाया विज्ञानाधिष्ठित असावा.
४ विज्ञान लेखकाने कलाकृतीत उभे केलेले जग वाचकालाही वेगळया दृष्टीने पहायला लावते.
५भक्कम शास्त्रीय पुरावा आणि बुध्दिनिष्ठ अंदाज यावर विज्ञान कांदबरी लेखकाची कल्पनाशक्ती अस्तित्वात नसलेल्या प्रांतात शिरते.
६विज्ञान साहित्यिक भविष्यकाळात डोकावतात.आजची भेडसावणारी समस्या उदया आक्रळविक्राळ रूप धारण करणार अशा प्रश्नांना विज्ञान कांदबरी हात घालते.
७ भविष्यकाळात होऊ घातलेल्या बदलाचे चित्र प्रत्ययकारी स्वरूपात रेखाटले जाते.
८ विज्ञान माहिती आणि विज्ञान प्रसाराचाही दृष्टिकोन काही कलाकृतीत दिसतो.
९ विज्ञानकांदबरीत संबंध मानव जात,आकाशगंगा,सुर्यमाला,अवकाश, पाताळ,पृथ्वी,पर्यावरण,यंत्र,विज्ञान असे दृष्टीसमोर असणारी सारी प्रचंड अमर्याद गोचर—अगोचर सृष्टी येते.यात वैज्ञानिक दृष्टीतून अनुकूल प्रतिकूल परिणाम आपल्या कल्पनेतून लेखक साकारतो.ही विज्ञान कथा —कांदबरीला लागू पडणारी वैशिष्टये सांगता येतील.

**विज्ञान कथा :** मराठीत प्रारंभी विज्ञान कथाच अधिक प्रमाणात लिहिली गेली.मराठीत वा.म.जोशी यांची 'अदृश्य किरणांचा दृश्य प्रकाश' (१९१६)ही पहिली विज्ञान कथा मानली जाते मात्र त्या अगोदर मराठी साहित्यात प्रथम १८३३ मध्ये हरी केशवजींचे,'सिध्द पदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद'हे अनुवादित पुस्तक प्रसिद्ध झाले होते.नवल,हंस या मासिकांनी विज्ञान कथेला उचलून धरले.त्याकाळात द.चि.सोमण,द.पां. खांबोटे,गजानन क्षीरसागर,यशवंत रांजणकर अशा अनेक लेखकांनी इंग्रजी कल्पनांना भारतीय पेहराव देऊन विज्ञान कथेला या मातीत रूजविले. प्रारंभी रहस्यकथा, अद्‌भुतरम्य कथा,परीकथा,विज्ञानकथा यांची सळमिसळ होत होती.मात्र जसजशा विज्ञानकथा लिहिल्या जाऊ लागल्या तसतसे विज्ञानकथेचे स्वरूप स्पष्ट होऊलागले.

निरंजन घाटेंनी २० व्या शतकात प्रसिध्द झालेल्या विज्ञान साहित्याची नवभारतच्या डिसेंबरच्या अंकात यादीच दिली आहे.त्यात वा.म.जोशींची'अदृश्य किरणाचां दिव्य प्रकाश'(१९१६), 'वामलोचना'(१९१६),श्री.बा रानडेंची मनोरंजन मासिकात प्रसिध्द झालेली'तारेचे हास्य'(१९१५)'रेडियम'(१९१६),त्र्यं.र.देवगिरीकरांची, 'चित्रमय जगत' मध्ये प्रसिध्द झालेली '२०१८'(१९२३)व 'शरद लोकांची सफर' ना.वा.कोगेकरांची 'मृत्युकिरण''(१९३६)असे प्रारंभीच्या काळातले विज्ञान साहित्य तुरळक स्वरूपात प्रसिध्द झाले होते असे नमूद केले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात गेल्या तीस चाळीस वर्षात मात्र विज्ञान कथा अधिक प्रमाणात लिहिली गेली. विज्ञानकथा लिहिणा—या लेखकात लक्ष्मण लोंढे,निरंजन घाटे,आ.ना.पेडणेकर,रमेश सरदार,बाळ फोंडक,प्रा. रा.वि.सोवनी,चंद्रकांत पाटील,भालबा केळकर,शुभदा गोगटे,भैय्या पवार,सुबोध जावडेकर,यशवंत देशपांडे,अरूण मांडे,द.व्य.जाहगिरदार, सौ.रेखा बैजल,डिंगणकर,जयंत नारळीकर, माधुरी शानभाग, वसंत गोवारीकर अशा अनेक विज्ञान कथा लेखकांनी विज्ञानकथा विकसित केली. विज्ञान परिषदा घेऊन विज्ञान कथेच्या संकल्पनाही स्पष्ट केल्या.त्यातुन विज्ञानकथा विकसित केली. विज्ञान परिषदाघेऊन विज्ञान कथेच्या संकल्पनाही स्पष्ट केल्या.त्यातून विज्ञान कथा व विज्ञान कांदबरीच्या स्वरूपाविषयी चर्चा झाली.या चर्चेतून अनेक विचारवंतांनी केलेल्या विज्ञान साहित्याच्या व्याख्यांमधून विज्ञान साहित्याची बलस्थाने व वैशिष्टय सांगितली,त्यांचा उल्लेख वर आला आहेच.ज्या कथा लेखकांनी विज्ञान कथा लिहिल्या त्यातील बहुतेकांनी विज्ञान कांदब—याही लिहिल्या आहेत.

**विज्ञान कांदबरी:**मराठीतील विज्ञान साहित्याच्या स्वरूपाचा विचार करताना काही विचारवंतानी केलेल्या व्याख्यांचा ऊहापोह केला आहे. विज्ञान साहित्याचे स्वरूप मांडताना त्यात विज्ञान साहित्याची जी बलस्थाने आहेत किंवा वैशिष्टये आहेत तीच वैशिष्टये विज्ञान कांदबरीचीही सांगता येतील. विज्ञान कांदबरी म्हणून विज्ञान साहित्य संकल्पनेप्रमाणे 'विज्ञान साहित्य हे प्रथम साहित्य असते.'नंतर ते विज्ञान साहित्य आहे की नाही ते त्या साहित्यातील आशय व स्वरूपावरून ठरते.तसेच विज्ञान कांदबरीच्या संदर्भात असे म्हणता येईल की विज्ञान कांदबरी ही प्रथम कांदबरी असते.या कादंबरीची रचना करताना,तिचे घटक,तिची वैशिष्टये,तिची चौकट,मांडणी'' विज्ञानाच्या पायावर असते.विज्ञानाच्या ज्ञानावर आपल्या कल्पनेतून संभवनीयतेच्या पातळीवर तो लेखन करताना अवास्तव मांडत नाही.विज्ञान युगात विज्ञानाच्या विविध शोधांतून बदलणा—या समाज जीवनाचा व माणसाच्या मनातील वैज्ञानिक शक्यतेच्या पातळीवर कल्पना मांडतो.कधी तत्कालीन प्रश्नाचे भविष्यात निर्माण होणा—या अक्राळविक्राळ रूपाचे दर्शन लेखक विज्ञान कादंबरीत घडवू शकतो.यशवंत रांजणकरांनी विज्ञान कादंबरीची व्याख्या करताना ''आजवरची साध्य वैज्ञानिक प्रगती,संकल्पित तसेच ज्याच्या साध्या विषयीचे प्रयत्न चालू आहेत. अशी

वैज्ञानिक उद्दिष्टे आणि तीच्या आधारे केलेले भावी काळाविषयीचे वैज्ञानिक कल्पनारंजन,विज्ञान विचार सिध्दांत यावर आधारलेली अथवा पार्श्वभूमी असलेली कथा—कादंबरी म्हणजे विज्ञान काल्पनिका'' असे म्हटले आहे.

मराठी विज्ञान कादंबरीचे मूळ उद्दिष्ट—विज्ञान शिक्षणाचे नाही चांगल्या ललित साहित्याची उद्दिष्टे, तीच विज्ञान कादंबरीची उद्दिष्टये ठरतात. थोडक्यात ती प्रथम कादंबरी असली पाहिजे कादंबरीच्या रचना चौकटीत विशिष्ट घटकांसह कादंबरीच्या स्वरूपात ती उतरली पाहिजे.औद्योगिकीकरणानंतर विज्ञान शोधामुळे मानवी जीवनात झालेले अमूलाग्र परिवर्तन, काळाची मागणी लक्षात घेऊन निर्माण होत असलेले विज्ञानसाहित्य हे विज्ञानाचा पाया असलेल्या निर्मितीचा भाग आहे. विज्ञान कादंबरी मध्ये वैज्ञानिक शोध, वैज्ञानिक आकृत्या, गणिती समीकरणे आणि विद्वजडटीपा—टिपण्या विषयाच्या प्रतिपादनासाठी देण्याची गरज नाही. कादंबरीच्या कथानकातील घटकांची ती मागणी असेल तरच ते येऊ शकेल.विज्ञान कादंबरी कल्पनेच्या स्तरावरील नवनिर्मित असते. संभवनीयता आणि वैज्ञानिक शक्यतेच्या मर्यादित या कथानकातील कल्पित वावरत असते. विज्ञान कादंबरीकारही वेगळा अनोखा अनुभव सांगण्याचा प्रयत्न करतो. सगळेच कादंबरीकार वेगळे अनुभव सांगतात मात्र हा अनुभव नेहमीच्या आयुष्यापेक्षा अगदी वेगळा असतो पण खोटा नसतो, अवास्तवही नसतो. तो अनुभव अनेक वेळा त्यालाच काय पण कुठल्याही माणसाला आजतायत आलेला नसला तरी आज ना उदया तो येणे शक्य आहे. या संभवनीयतेच्या पातळीवर तो मनाला भिडणारा असतो. याच स्वरूपात मराठी विज्ञान कादंबरी मराठीमध्ये लिहिली जाऊ लागल्याचे दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळात मराठीत विज्ञानविषयक कादंब—या तुरळक स्वरूपात लिहिल्या गेल्या. मराठीत विज्ञानकथा अधिक आहे. विज्ञान कथेतून 'विज्ञानकांदबरी'पुढे आली.खरे तर'विज्ञानकांदबरी'हीसंज्ञा विसंगत वाटत असली तरी ''डॉ.व्यंकटवर्धन यांनी म्हटल्याप्रमाणे जेव्हा दोन कल्पनांचा, दोन विचारांचा संयोग होतो किंवा संघर्ष होतो तेव्हा सृजनशिलतेचा जन्म होतो''म्हणजे 'विज्ञानकादंबरी ' या संकल्पनेचा शब्दशः अर्थ न घेता तिच्या आशय स्वरूपाचा विचार महत्वाचा आहे.विज्ञानाकडून घेतलेली तार्किकता आणि ललितसाहित्यातून घेतलेली विलक्षण कल्पनाशक्ती यांच्या सुरेख संगमातून विज्ञानात्मकता ललित साहित्य निर्मिती झालेली दिसते.'' विज्ञान साहित्य ही संज्ञा"बपदबम थ्पबजपवदया संज्ञेचा मराठी पर्याय असून 'साहित्य' ही संज्ञा सर्जनशील या अर्थाने वापरली''. ज्या साहित्य कृतीचा आशय विज्ञाननिष्ठ असतो ती साहित्यकृती विज्ञान साहित्य ठरते.

विज्ञानातील प्रयोगात्मक सत्य घेवून त्या दृष्टीने कल्पना करून भविष्याचा विचार करतांना संभवनीयतेच्या पातळीवर केलेले चित्रण विज्ञानाला दिशा देणारे विज्ञान साहित्य ठरावे.

''विज्ञानाच्या आणि विज्ञाननिष्ठ तर्काच्या भक्कम भूमीवर पाय रोवून उभे राहायचे आणि विज्ञानांतराळात स्वप्नांचे स्वच्छ आणि सुस्पष्ट आकृतीबंध रेखाटायचे ही विज्ञान लेखकाची प्रतिभा मानता येईल.'' विज्ञान कादंबरी ही कादंबरी क्षेत्रातली नवी घटनाच म्हणावी लागेल. भक्कम शास्त्रीय पुरावा आणि बुध्दिनिष्ठ अंदाजावर विज्ञान कादंबरी चित्रित व्हावी. लेखकांचे तोकडे विज्ञाननिष्ठ ज्ञान व वाचकांचे विज्ञानविषयक अज्ञान विज्ञान कादंबरीला न्याय देवू शकत नाही. ही मर्यादा लक्षात घेवून विज्ञानदृष्टीतून लेखकाने वाचकांसमोर विज्ञानदृष्टी उभी करणे आवश्यक आहे.

मराठी कादंबरी वाङ्‌मय प्रकारामध्ये विज्ञान कादंबरीचा उदय इंग्रजी कादंबरीमधील विज्ञान कादंबरीच्या अनुकरणातूनच झाला. शास्त्रज्ञ सृष्टीचा अभ्यास करून तर्कसंगतीतून सत्य शोधून काढतात त्याप्रमाणे ललित लेखकही सत्यच शोधण्याचा प्रयत्न करतो. प्रत्यक्ष ज्ञानाधारे शास्त्रज्ञ प्रयोगाने काही बाबी स्पष्ट करतो. लेखकही सृष्टीचे ज्ञान मिळवून अनुभव व भावसंगतीतून आपली कल्पना मांडतो दोघेही सत्याचे शोधक असतात. विज्ञान सृष्टीला मराठी कादंबरी कवेत घेण्याचा प्रयत्न करते आहे. ही काळाची गरज आहे. प्रारंभीच्या प्रयत्नात विज्ञान कादंबरी लेखकाचा आढावा घेता येईल.

मराठी कादंबरीत विज्ञान कादंब—या नगण्य असल्या तरी जयंत नारळीकर, लक्ष्मणे लोंढे, निरंजन घाटे, अ.ना. पेडणेकर, रमेश सरदार, बाळ फोंडके,प्रा.रा.वि.सोवनी,चंद्रकांत पाटील,प्रा.भालबा केळकर, भय्या पवार, डॉ. व.दि. कुलकर्णी आदी विज्ञान विषयक लेखन करणा—यांनी विज्ञान कादंबरीला वाट करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

नाथमाधवांनी १९०८मध्ये'श्रीनिवासराव' ही विज्ञानाधिष्ठित पहिली कादंबरी लिहिल्याचा उल्लेख आहे. याशिवाय वि. वा. शिरवाडकरांची 'कल्पनेच्या तीरावर' आणि ना.के. बेहेरे यांची 'ध्येयाकडे' या भविष्यातील आदर्श समाजाचे चित्रण करणा—या विज्ञान कादंब—या आहेत.याचा उल्लेख १९८७ च्या 'सृष्टिज्ञान'च्या संपादकीयमध्येकेला.स्वातंत्र्योत्तर काळात सुरेंद्र बारलिंगे यांची 'मी माझेपण' ही

लिंगबदलावरील विज्ञान माहितीची बैठक घेवून स्त्रीपुरूष द्वंद्वातील मानसिक ताण समर्थपणे व्यक्त करणारी कादंबरी आहे.जयंत नारळीकरांनी मराठीमध्ये खगोलशास्त्रावर बरेचे लेखन केले आहे. नारळीकरांचे गुरू प्रा. फ्रेड हॉइल यांच्या 'कृष्णमेघ' या कादंबरीच्या प्रेरणेतून त्यांनी विज्ञानकथा शिवाय'प्रेषित'व'वामन परत न आला'या व इतर विज्ञान कादंब—या लिहिल्या.''कथा कादंबरी—कविता हया प्रस्थापित साहित्यिक माध्यमातून एखादया वैज्ञानिक कल्पनेचे चित्रण करणे ती समजावून सांगणे हे नारळीकर विज्ञान साहित्याचे उद्दिष्ट मानतात.''नारळीकरांनी कादंबरी लेखन मुळात माध्यम म्हणून स्वीकारलेले असल्याने कादंबरीचा घाट रचना या दृष्टीने विचार झाला नाही.कादंबरीत इंग्रजी शब्दांचा वापर अधिक येतो. त्यांची 'वामन परत न आला' ही कादंबरी १)पेटारा२)बृहस्पती ३)वामन अशा तीन भागात आहे. या कादंबरीत विज्ञान शोधाची माहिती देऊन संगणक आणि यंत्रमानव यांचे विशालपण व मर्यादा विशद केल्या आहेत.बृहस्पती हे संगणकाला व वामन हे यंत्रमानवाला दिलेले नाव भारतीय प्राचीन ज्ञानाची ओळख करून देणारे आहे. या दोन्ही कादंब—या विज्ञानाचे ज्ञान देणा—या आहेत.

निरंजन घाटे हे विज्ञान कथाकार म्हणून लोकप्रिय आहेत. त्यांनीही अनेक विज्ञान कादंब—या लिहिल्याआहेत.त्यांच्या'फिनिक्स','रामचेआगमन','मच्छर','आक्रमण','साक्षात्कार','आभाळतून',' वारस' इत्यादी कादंब—या प्रसिद्ध आहेत.गो. बा. सरदेसाई यांची 'त्रिपुरारी'ही पौराणिक कथांना आधुनिकतेचा संदर्भ देणारी विज्ञानपर कादंबरी आहे. राजेंद्र बर्वे यांची 'स्काय लॅब' ही अशीच विज्ञान कादंबरी आहे.

लक्ष्मण लोंढे हे ही विज्ञान कथाकार म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांच्या काही विज्ञान कादंब—या आहेत त्यांची 'देवासी जीवे मारिले' ही लक्षणीय विज्ञान कादंबरी आहे. शुभदा गोगटे यांनी मराठी कादंब—याबरोबर काही विज्ञान कादंब—या लिहिल्या. त्यांची 'यंत्रायणी' ही विज्ञानावर आधारीत कादंबरी आहे.याशिवाय डॉ.भा.ल.महाबळांनी'आभाळतोकडे','जंगलगाथा','विहंगान','थवेपाखरांचे'हया विज्ञानविषयक कादंब—या लिहिल्या आहेत.दि.बा. मोकाशी यांच्या 'जगाच्या कोलांटया','बालचंद्र','यंत्र आणि तत्र',रविंद्रदेसाई यांची' ग्यानबाचा गोबरगॅस'वसंत शिरवाडकरांची'माणूस कसा झाला'अनिल गोटेंची 'माकड चेष्टा'नाडकर्णीची'पृथ्वीवर माणूस उपराच' इत्यादी विज्ञानपर कादंब—या या काळात लिहिल्या गेल्या.

अरूण साधू यांनी वेगवेगळया विषयावर कादंब—या लिहिल्या आहेत. त्यापैकी 'स्फोट' आणि 'विप्लवा'हया विज्ञानविषयक कादंब—या आहेत. मात्र'विप्लवा'ही विज्ञानपर कादंबरी असल्याचे स्वत: साधू नाकारतात. कादंबरीच्या मलपृष्ठावर'एक आगळी विज्ञान कादंबरी' असे लिहिले आहे. फोंडके त्याला सोयीस्कर भूमिका म्हणतात.एकंदरीत मराठीतील विज्ञान कादंबरी अद्यापबाल्यावस्थेतच दिसते. तरी मराठी वाचकांसमोर विज्ञानाच्या कल्पनेला घेऊन टप्प्याटप्प्यावर काही लक्षणीय कादंब—या काही कादंबरीकारांनी लिहिल्या आहेत.त्यात जयंत नारळीकर,लक्ष्मण लोंढे,निरंजन घाटे,बाळ, फोंडके, अरूण साधू, गजानन क्षीरसागर, आदी नांवे सांगता येतील.

**निष्कर्ष:—**

**१** विज्ञान साहित्य ही संज्ञा सायन्स फिक्शन यां संज्ञेचा मराठी पर्याय आहे. या संज्ञेमध्यविज्ञानकथा, विज्ञान कादंब—या, आणि थोडयाप्रमाणात विज्ञानकविता, विज्ञान नाटकाचा समावेश होतो.

२ विज्ञान साहित्यात विज्ञान हा शब्द येत असला तरी विज्ञान साहित्य ही कल्पनेच्या स्तरावरील नवनिर्मिती असते.

३ विज्ञान साहित्यात संभवनियता आणि शक्यता यांच्या मर्यादित कल्पितांची मांडणी केलेली असते.

४ भक्कम शास्त्रीय पुरावा आणि बुध्दिनिष्ठ अंदाज यावर विज्ञानसाहित्य लेखकाची कल्पनाशक्ती अस्तित्वात नसलेल्या प्रांतात शिरते.

५ विज्ञान साहित्याचा विचार करता मराठी साहित्यात विज्ञान कथाकरांनीच बहुतांश विज्ञान कादंब—या लिहिल्या आहेत.

**संदर्भ—**


१. किंबहुने रविंद्र,प्रतिष्टान,म.सा.प. औरंगाबाद मे—जून २०००.
२. कुळकर्णी,व.दि.,'विज्ञान साहित्य आणि संकल्पना'नीहारा प्रकाशन पुणे.
३. साधू अरूण,'स्फोट' मॅजेस्टिक मुंबई प्रथमावृत्ती १९७८.
४. कुळकर्णी दिलिप,'अणुविवेक' राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९५.
५. कर्वे चि.श्री.,'नवविज्ञान क्षीतीजे' परिमल प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती,१९८३.
**६.** नारळीकर जयंत,'विज्ञानाची गरूडझेप 'श्री विदया प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती १९९०.
७. आपटे मोहन,'शतक शोधाचे' राजहंस प्रकाशन पुणे,प्रथमावृत्ती २०००.
८. घाटे निरंजन,'सहस्त्र सुर्याच्या छायेत',अनिल मेहता, पुणे,प्रथमावृत्ती १९९०